# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:07.02.2026** **वार:शनिवार**

1. 'परीक्षा पे चर्चा' कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं विद्यार्थ्यांना मार्गदर्शन
2. रिझर्व्ह बँकेकडून रेपो दरात बदल नाही
3. राज्यातल्या जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीसाठी आज मतदान
4. राज्यातल्या विविध महापालिकांमधल्या महापौर आणि उपमहापौर पदांची निवड जाहीर, अनेक ठिकाणी निवडणूक बिनविरोध आणि
5. 19 वर्षांखालील युवकांच्या 50 षटकांच्या क्रिकेट सामन्याच्या विश्वकरंडकावर पुन्हा भारताची मोहोर

**<u>परीक्षा पे चर्चा</u>**

प्रत्येक विद्यार्थ्याची परीक्षेची तयारी करण्याची आपली अशी एक वेगळी पद्धत असते. विद्यार्थ्यांनी आपल्या या पद्धतीवर विश्वास ठेवणं महत्त्वाचं आहे असा सल्ला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिला आहे. परीक्षा पे चर्चा या संवादात्मक कार्यक्रमाच्या 9 व्या भागाची ध्वनीचित्रफीत मोदी यांनी काल प्रकाशित केली. या कार्यक्रमात त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधून परीक्षेचा ताण हलका करण्याबाबत मार्गदर्शन केलं.

शिक्षणातून मिळालेलं ज्ञान विद्यार्थ्यांच्या मनात नैसर्गिकरित्या रुजावं या उद्देशानं शिक्षकांनी विद्यार्थ्यांची मानसिक जडणघडण केली पाहिजे असं सांगून परीक्षेचं आयुष्यातलं महत्त्व समजावून सांगताना पंतप्रधान म्हणाले...

**जिंदगी परीक्षा के लिए नहीं है हमारे जीवन को बनाने के लिए शिक्षा एक माध्यम है और हम शिक्षा सही करते हैं, गलत करते हैं तो बार–बार हम अपने एग्जाम करते हैं, तो ये जो एग्जाम है तो हमें अपने आप को एक्जामिन करने के लिए एक्जाम हैं। अल्टीमेट गोल एक्जाम के नंबर नहीं हो सकता है, अल्टीमेट गोल संपूर्ण जीवन के विकास का होना चाहिए।**

कौशल्य, परीक्षेतील गुणांपेक्षा जास्त महत्त्वाचं आहे का? असा प्रश्न, सवाबत वेंकटेश या विद्यार्थ्यानं या कार्यक्रमात विचारला. त्याला उत्तर देताना मोदी म्हणाले.....

**स्किल में भी दो प्रकार के स्किल हैं एक है लाइफ स्किल, दूसरा है प्रोफेशनल स्किल। स्किल की शुरूआत तो ज्ञान से ही होती है तो उसका महत्व कम नहीं है। लाइफ स्किल उसमें कोई कम्प्रोमाइज़ नहीं है, हंडरेड परसेंट वो तो अचीव करना ही चाहिए। प्रोफेशनल स्किल, जिस प्रोफेशनल में इंटरेस्ट है इसमें लगातार नया करते जाना है। शिक्षा और स्किल एक-दूसरे के जुड़वा भाई-बहन हैं, लेकिन स्किल जीवन में बहुत अनिवार्य है।**

स्वतःशी प्रामाणिक राहाल तर खरा आत्मविश्वास मिळेल. स्वप्नं न पाहणं ही सगळ्यात मोठी चूक आहे असं सांगून, न घाबरता स्वप्न पाहा आणि थोरांच्या चरित्रातून प्रेरणा घ्या असं आवाहन पंतप्रधान मोदी यांनी विद्यार्थ्यांना केलं.

**<u>आरबीआय</u>**

भारतीय रिझर्व्ह बँकेनं चालू आर्थिक वर्षाच्या शेवटच्या द्वैमासिक पतधोरणात, रेपो दरात काहीही बदल केलेला नाही. पतधोरण समितीच्या सदस्यांनी एकमतानं हा निर्णय घेतल्याचं आरबीआयचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी काल सांगितलं. 2026-27 या आर्थिक वर्षातल्या पहिल्या तिमाहीत ग्राहक किंमत आधारित महागाई निर्देशांक 4 टक्के राहील असा अंदाज पतधोरण समितीनं व्यक्त केला आहे. महागाई निर्देशांकातली ही वाढ सोन्यासारख्या मौल्यवान धातूंच्या दरात झालेल्या वाढीचा परिणाम असल्याचं मल्होत्रा म्हणाले. सकल देशांतर्गत उत्पादन वाढीचा दर पहिल्या तिमाहीत 6 पूर्णांक 9 दशांश टक्के तर दुसऱ्या तिमाहीत 7 टक्के असेल असंही रिझर्व्ह बँकेनं म्हटलं आहे.

**<u>जिल्हा परिषद निवडणूक</u>**

राज्यातल्या जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकीसाठी आज मतदान होत आहे. सकाळी साडेसात ते संध्याकाळी साडेपाचपर्यंत मतदानाची वेळ असून सर्व प्रशासकीय यंत्रणा, निवडणूक शांततेत पार पाडण्यासाठी सज्ज आहेत. काल सर्व ठिकाणच्या जिल्हाधिकाऱ्यांनी मतदानाच्या तयारीचा आढावा घेतला. मतदान केंद्रांच्या परिसरात चोख सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली आहे.

दरम्यान, मतदारांना मतदानाचा हक्क बजावता यावा आणि मतदान सुरळीतपणे पार पडावं यासाठी, विविध गावातले आठवडा बाजार आज बंद ठेवण्यात येणार आहेत. उद्योग, आस्थापना आणि कारखान्यांमधल्या कामगार तसंच कर्मचाऱ्यांना आज भर पगारी सुटी जाहीर करण्यात आली आहे. अपवादात्मक परिस्थितीत पूर्ण दिवस सुट्टी देणं शक्य नसेल तिथं दोन ते तीन तासांची सवलत देण्याबाबत सूचना देण्यात आली आहे. संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी यासंदर्भातले आदेश जारी केले आहेत.

जिल्हा परिषद-पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण करून, कायदा-सुव्यवस्था राखण्याच्या उद्देशाने रत्नागिरी जिल्ह्यातल्या सर्व पोलीस ठाण्यांच्या कार्यक्षेत्रात 'रूट मार्च' काढण्यात आला, तर, देवरूखमध्ये पोलिसांतर्फे मतदान जनजागृती फेरी आणि पथनाट्याचं आयोजनही करण्यात आलं होतं.

**<u>महापौर निवड</u>**

राज्यातल्या विविध महापालिकांमधल्या महापौर आणि उपमहापौर पदांची निवड काल जाहीर करण्यात आली. **पिंपरी चिंचवड** शहराच्या महापौरपदाची सूत्रं भारतीय जनता पक्षाचे रवी लांडगे यांनी, तर शर्मिला बाबर यांनी उपमहापौरपदाची सूत्रं काल स्वीकारली.

**कोल्हापूर** महानगरपालिकेत भाजपाच्या रुपाराणी निकम यांनी महापौरपदाची निवडणूक जिंकली, तर जनसुराज्य शक्ती पक्षाचे अक्षय जरग उपमहापौर म्हणून निवडून आले. कोल्हापूर महापालिकेत काँग्रेसच्या

नगरसेवकांची संख्या सर्वाधिक असूनही महापौर निवडीसाठी आवश्यक संख्याबळाच्या अभावी काँग्रेसच्या उमेदवारांना पराभव पत्करावा लागला. कोल्हापुरात पहिल्यांदाच महायुतीचे उमेदवार महापौर आणि उपमहापौर म्हणून निवडून आले आहेत.

**अहिल्यानगर** महापालिकेत निवडणूक बिनविरोध झाली. महापौरपदी राष्ट्रवादीच्या ज्योती गाडे यांची, आणि उपमहापौरपदी भाजपाचे धनंजय जाधव यांची निवड झाली.

**सोलापूर** महानगरपालिकेत भाजपाचे विनायक कोंड्याल महापौरपदी, तर ज्ञानेश्वरी देवक उपमहापौरपदी बिनविरोध निवडून आले. शिवसेना आणि एम आय एमच्या उमेदवारांनी आपले अर्ज मागं घेतल्यामुळे ही निवड बिनविरोध झाली.

**नाशिक**मध्ये भाजपाच्या हिमगौरी आडके महापौर म्हणून, तर शिवसेनेचे विलास शिंदे उपमहापौर म्हणून बिनविरोध निवडून आले. काल विरोधी पक्षांच्या उमेदवारांनी आपले अर्ज मागं घेतल्यामुळे ही निवडणूक बिनविरोध झाली.

**जळगांव** महानगरपालिकेत भाजपाच्या दीपमाला काळे यांची महापौरपदी आणि शिवसेनेच्या मनोज चौधरी यांची उपमहापौरपदी बिनविरोध निवड झाली.

**अमरावती** महानगरपालिकेच्या महापौर आणि उपमहापौरपदाची निवडणूक काल झाली. भाजपाचे श्रीचंद तेजवानी महापौर म्हणून निवडून आले तर उपमहापौरपद युवा स्वाभिमान पक्षाच्या सचिन भेंडे यांना मिळालं.

**<u>परिवहनमंत्री</u>**

बसेस वेळेवर धावल्या तरच उत्पन्नाची चाकं वेगानं फिरतील असा सल्ला राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी काल दिला. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या उत्पन्नवाढ आढावा बैठकीत ते बोलत होते. या बैठकीला महामंडळाच्या उपाध्यक्षांसह सर्व विभागप्रमुख उपस्थित होते. एसटी ही सर्वसामान्यांची जीवनवाहिनी आहे. प्रवाशांना ताटकळत ठेवणं म्हणजे त्यांना पर्याय शोधायला भाग पाडणं आहे असं सरनाईक यावेळी म्हणाले. आगार पातळीवरील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी अधिक जबाबदारीनं काम करून एसटीची प्रत्येक फेरी नियोजित वेळी सुटेल याची खात्री करावी असं त्यांनी सांगितलं.

**<u>स्वरक्षण प्रशिक्षण-अकोला</u>**

राष्ट्र प्रथम अभियानाअंतर्गत मुलींना सक्षम आणि आत्मविश्वासपूर्ण बनवण्यासाठी राज्यातल्या 21 हजार 279 शाळांधल्या मुलींना स्वरक्षणाचे धडे दिले जाणार आहेत. अकोला जिल्ह्यातल्या शासकीय आणि अनुदानित शाळांमध्ये हा उपक्रम राबवला जाणार आहे. यामध्ये मुलींना मार्शल आर्टस, योग, प्राणायाम शिकवला जाणार असून त्यांच्या मानसिक आणि व्यक्तीमत्व विकासावरही भर दिला जाणार आहे.

**<u>नक्षलवादी-चकमक-गडचिरोली</u>**

छत्तीसगड राज्य आणि गडचिरोली जिल्ह्यातल्या भामरागड तालुक्यातील सीमावर्ती भागात असलेल्या फोदेवाडा गावानजीकच्या जंगलात पोलिस आणि नक्षलवाद्यांमध्ये गेल्या तीन दिवसांपासून सुरु असलेल्या

चकमकीत सात नक्षलवादी ठार झाले आहेत. यात नक्षल्यांचा कमांडर ठार झाला आहे. या चकमकीत सुरक्षा दलातील एका जवानाला वीरमरण आलं तर एक जवान जखमी झाला आहे.

**क्रिकेट**

19 वर्षांखालील युवकांच्या 50 षटकांच्या क्रिकेट सामन्यांचा विश्वकरंडक काल भारतीय संघानं उंचावला. हरारे इथं झालेल्या अंतिम सामन्यात भारतीय संघानं इंग्लंडच्या संघावर शंभर धावांनी विजय मिळवला. भारतीय संघानं सहाव्यांदा विश्वकरंडकावर आपलं नांव कोरलं आहे. भारतीय संघानं प्रथम फलंदाजी करताना 50 षटकांत 411 धावा केल्या. वैभव सुर्यवंशीनं 80 चेंडूत तडाखेबंद 175 धावा केल्या. दीडशे धावांचा टप्पा 71 चेंडूत पार करताना त्यानं नव्या विक्रमाची नोंद केली. वैभवलाच सामनावीर तसंच स्पर्धेतील उत्कृष्ट खेळाडू म्हणून गौरवण्यात आलं.

भारताच्या या काहीशा कठीण आव्हानाचा सामना करताना इंग्लंडचे सर्व फलंदाज 311 धावांवर बाद झाले. भारताच्या आरएस अंबरीनं 3, दीपेश देवेंद्रन आणि कनिष्क चौहाननं प्रत्येकी 2 तर खिलान पटेल आणि आयुष म्हात्रेनं प्रत्येकी एका फलंदाजाला बाद केलं. राष्ट्रपति द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपति सी. पी. राधाकृष्णन, पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय युवक आणि क्रीडा मंत्री मनसुख मांडवीय यांनी या विजायबद्दल भारतीय युवक क्रिकेट संघाचं अभिनंदन केलं आहे.

**हवामान**

विदर्भ आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी किमान तापमानात सरासरीच्या तुलनेत किंचित घट झाली आहे. आज राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.**

**नमस्कार.**